# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ
केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४००००५.
दूरध्वनी : ०२२ - २२१६ ३९६४ / ६५ / ६९ फॅक्स : ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in
संकेतस्थळ : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

जाहिरात क्र. २/२०१७-१८

## निविदा सूचना

### महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास तांत्रिक आणि नियामक कामांमध्ये सहाय्य करण्यासाठी सल्लागारांची नामसूची तयार करण्याबाबत

विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून (आयोग) विजेची निर्मिती, पारेषण, वहन आणि विजेचा ठोक किंवा किरकोळ पुरवठ्याचे दर निश्चित करणे, वीज वितरण परवानाधारकांच्या विजेची खरेदी आणि वीज प्राप्त करुन घेण्याच्या प्रक्रियेचे नियमन करणे, विजेच्या पारेषण, वितरण आणि व्यापारासाठी परवाना मंजूर करणे, नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मिती आणि सह-निर्मितीस चालना देणे इ. विविध कामे करण्यात येतात.

आयोगाला आपली कामे प्रभावीपणे पार पाडणे शक्य व्हावे यासाठी आयोगाने तांत्रिक अर्हता प्राप्त आणि व्यावसायिक व्यवस्थापन असलेल्या सल्लागारांच्या फर्म्स/संस्थांची नामसूची तयार करण्याचे ठरविले आहे.

कामाची व्याप्ती, पात्रता निकष आणि आवश्यक अर्हता, स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्यासाठीचा नमुना, कार्यपद्धती आणि मूल्यांकनाची पद्धती, इ. बाबतचा सविस्तर तपशील प्रत्येक कामासाठी (तांत्रिक आणि नियामक) स्वतंत्रपणे खालील शीर्षकांखाली महाराष्ट्र शासनाच्या **“https://mahatenders.gov.in”** या ई-पोर्टलवर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | कामाचे स्वरुप |
|---|---|
| अ | **तांत्रिक बाबींशी संबंधित कामे**<br>भाग - १ वीज दर निश्चित करणे<br>भाग - २ ऊर्जा कार्यक्षमता आणि वीज मागणी व्यवस्थापन<br>भाग - ३ नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून निर्मिती आणि सह-निर्मिती<br>भाग - ४ विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत सोपविण्यात आलेली अन्य कार्ये पार पाडणे आणि परवानाधारकांनी द्यावयाच्या दर्जेदार सेवेसाठी मानके ठरवून देणे |
| ब | **नियामक विषयक कामे**<br>भाग - १ विनियम तयार करणे, आढावा घेणे व सुधारणा करणे<br>भाग - २ विजेच्या पारेषण, वितरण आणि व्यापारासाठी परवाना मंजूर करणे<br>भाग - ३ वीज निर्मिती कंपन्या आणि वितरण परवानाधारक यांच्यातील वाद आणि वीज खरेदी करारा संबंधित (पीपीए) वादांवर अभिनिर्णय देणे<br>भाग - ४ विद्युत नियमानाची क्षमता वाढविणे |

पात्रता निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, वरीलपैकी कोणत्याही एक किंवा दोन्ही कामांसाठी आयोगास निविदा सादर करता येईल.

स्वारस्य अभिव्यक्ती/निविदा दिनांक २२ जून, २०१७ रोजी संध्याकाळी १६.०० पर्यंत किंवा त्यापूर्वी **“https://mahatenders.gov.in”** या ई-टेंडरींग पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाईन सादर करावी.

दिनांक : -- मे, २०१७
ठिकाण : मुंबई

सचिव
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**Size : 12 (W) x 15 (H) = 180 SQC**